दै. गोदातीर दि. 23/01/25

# घरात संस्कार आणि बाहेर कायद्याचे पालन करा -तहसीलदार वारकड



**नांदेड (प्रतिनिधी)**– नागरिकांनी आपल्या घरात प्रथा, परंपरा, संस्कार याची जपणूक केली पाहिजे. मोठ्यांचा आदर केला पाहिजे तर घराची चौकट ओलांडून आपण जेव्हा बाहेर पडतो तेव्हा आपण कायद्याचा आदर करून आपल्यापासून कोणाला त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन नांदेडचे तहसीलदार संजय वारकड यांनी केले.

वजिराबाद पोलीस ठाण्यात कायदेविषयक शिबिराचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी बुधवार दि. २२ जानेवारी रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास आयोजन केले होते. यावेळी तहसीलदार वारकड बोलत होते.

व्यासपीठावर सरकारी वकील सीमा जोहरे, सुरभी जयस्वाल, ॲड. नावेद पठाण, ॲड. वैद्य, संतान यांची उपस्थिती होती.

संजय वारकड म्हणाले की, आपल्या घरामध्ये जे आपण संस्कार, रितीरिवाज शिकतो तोही कायदाच आहे. तसेच घराबाहेर जेव्हा आपण पडतो तेव्हा आपल्या वर्तनामुळे कोणाला त्रास होणार नाही कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी नृत्य करणे कायद्याला धरून नाही. दारू पिऊन गाडी चालवणे, अपघातग्रस्ताला मदत न करणे या बाबी कटाक्षाने टाळल्या पाहिजे. सानथोरांचा मान- सन्मान केला पाहिजे. हेच नवीन कायद्याला अभिप्रेत आहे.

यावेळी ॲड. नावेद पठाण यांनी भारतीय दंड संहिता आणि भारतीय न्याय संहिता यामध्ये काय बदल झाला, याचे सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच ॲड. सीमा जोहरे आणि ॲड. वैद्य यांनीही कायद्यासंदर्भात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सेवे संदर्भात माहिती दिली. पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर पोलीस उपनिरीक्षक बालाजी किरवले यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ज्येष्ठ नागरिक, व्यापारी, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी, प्राध्यापिका, पत्रकार, पोलीस अधिकारी, कर्मचारी आदींची उपस्थिती होती. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.